नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६४ Issue - 164 | वार - सोमवार दि. ९ नोव्हेंबर २०२६ Blow- Monday Date 9 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

आता खरी लढाई ‘दिमागी नक्षलवाद्यांशी’

बस्तरमधून पंतप्रधान मोदी यांचा विरोधकांना इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षी दिवाळीच्या निमित्ताने छत्तीसगढमधील बस्तरला भेट दिली. त्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली. त्यांनी नक्षलवादाच्या निर्मूलनाबद्दल सैनिकांचे अभिनंदन केले आणि सांगितले की ही पहिली दिवाळी आहे, ज्यात देश नक्षलवादापासून पूर्णपणे मुक्त झाला आहे. मात्र त्यांनी राजकीय विरोधकांवरही निशाणा साधला. ते म्हणाले की, नक्षलवाद जरी समूळ नष्ट झाला असला तरी अजूनही काही मानसिक नक्षलवादी शिल्लक आहेत जे लोकांना भडकवत आहेत आणि आपण त्यांचा पराभव केलाच पाहिजे. पंतप्रधान मोदी म्हणाले, ’आपल्या शूर सैनिकांसोबत घालवलेली प्रत्येक दिवाळी माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. ही तीच भूमी आहे जिने एकेकाळी नक्षलवादी दहशतीचा कहर सोसला होता, परंतु तुमच्या बलिदानामुळे आणि समर्पणामुळे येथे नक्षलवादी दहशत संपुष्टात आली आहे आणि विकासाची नवी लाट सुरु झाली आहे.’ पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, आयआरबी आणि राज्य पोलीस दलातील जवानांचा देश ऋणी राहील. बस्तर फायटर्ससारख्या विशेष तुकड्यांमधील कमांडो आणि महिला सैनिकांनीही या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पंतप्रधान मोदी बस्तरमधून म्हणाले की, जेव्हा आपण राष्ट्र प्रथम या भावनेने काम करतो, तेव्हा देशाची शांतता आणि सुरक्षाही सुनिश्चित होते. देश विकासाची नवी शिखरे गाठतो, आणि विकासात प्रत्येक गरीब व वंचित व्यक्तीचा सहभागही वाढतो. म्हणूनच, गेल्या १२ वर्षांत देशाने केवळ नक्षलवाद आणि फुटीरतावादाविरुद्धची लढाईच जिंकली नाही, तर गरिबीविरुद्धची एक मोठी लढाईही जिंकली आहे. यावेळी दिवाळीच्या अगदी आधी अशी एक बातमी आली आहे, ज्याची चर्चा संपूर्ण देशात आणि जगभरात होत आहे. काही दिवसांपूर्वीच, जागतिक बँकेने आपल्या रिपोर्टमध्ये असे सांगितले आहे की भारतात गेल्या १२ वर्षांत ५० कोटी लोक भीषण गरिबीतून बाहेर आले आहेत. जे काम कित्येक वर्ष गरिबी हटाओचे नारे लावून झालं नाही ते १२ वर्षांत करून दाखवलं.

महायुती सरकारच्या काळातील विकासकामांबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ’आम्ही गरिबांसाठी कल्याणकारी योजनांचे एक जाळे विणले आहे, ज्यांनी त्यांना सातत्याने सक्षम केले आहे. ’जन धन योजने’च्या माध्यमातून कोट्यवधी लोकांना बँकिंग प्रणालीशी जोडले गेले आहे. ’पंतप्रधान आवास योजने’ने कोट्यवधी कुटुंबांना डोक्यावर कायमस्वरूपी छप्पर मिळवून दिले आहे. ’मुद्रा योजने’अंतर्गत आम्ही व्यक्तींना तारणमुक्त कर्ज उपलब्ध करून दिले आहे. ’स्वनिधी योजने’द्वारे आम्ही पथविक्रेत्यांनाही आधार दिला आहे. आता त्यांना आपला व्यवसाय विस्तारण्याची संधी मिळत आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत, आम्ही गरिबांना मोफत वैद्यकीय उपचार उपलब्ध करून दिले. आम्ही दरमहा लाखो कुटुंबांना मोफत रेशन पुरवले आणि मुलांच्या शिक्षणासाठी धोरणे आखली. थोडक्यात सांगायचे तर, आम्ही प्रत्येक गरीब कुटुंबासाठी मोफत आरोग्यसेवा, मोफत शिक्षण आणि मोफत स्वयंपाकाचे इंधन (स्वयंपाकाच्या गॅसची उपलब्धता) सुनिश्चित केले.’ या सर्व योजनांमुळे भारत आज गरिबीतून मुक्त होत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. ’जेव्हा आम्ही नक्षलवादाविरुद्ध लढा सुरू केला, तेव्हा त्याच वेळी आम्ही नक्षलग्रस्त भागांच्या विकासासाठी विशेष उपक्रमही हाती घेतले. आम्ही डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी प्रभावाखालील प्रदेशांत १५,००० किलोमीटरहून अधिक लांबीचे रस्ते बांधले. हे रस्ते पूर्ण सुरक्षा व्यवस्थेसह उभारण्यात आले. या भागांत ९,००० हून अधिक मोबाईल टॉवर्स बसवण्यात आले आहेत. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी सुमारे १७५ ’एकलव्य शाळा’ सुरू करण्यात आल्या. तरुणांना रोजगाराच्या संधींशी जोडण्यासाठी सुमारे ५० आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) स्थापन करण्यात आल्या. सुमारे ५० कौशल्य विकास केंद्रे उभारण्यात आली. हजारो पोस्ट ऑफिस, बँक शाखा आणि एटीएम सुरू करण्यात आले. त्यासोबतच आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना संधीदेखील देण्यात आली.’

मुख्यमंत्र्यांचा शेतकऱ्यांना दिलासा; शेतातील विंधन विहिरींवरील बंदी हटवली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : सध्या राज्यभरात आणि विशेषतः ग्रामीण भागात तीव्र दुष्काळी परिस्थिती पाहायला मिळत आहे. यावर मात करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे एका विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. यंदाच्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत असून जलसंकट गडद झाले आहे. याच पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून, जिथे खरोखर गरज आहे तिथे झाडे जगविण्यासाठी आणि केवळ शेतीकामाकरिता विंधन विहिरींवरील बंदी येत्या १५ डिसेंबरपर्यंत उठविण्यात येत असल्याची मोठी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी याच गावात मुक्काम करून ग्रामस्थांसोबत दिवाळी साजरी केली होती. त्यानंतर सकाळी पुढील दौऱ्यावर निघण्यापूर्वी त्यांनी तालुक्यातील विविध ग्रामपंचायत सरपंचांशी आणि लोकप्रतिनिधींशी सविस्तर संवाद साधला. या संवादादरम्यान लोकप्रतिनिधींनी यंदाच्या भीषण दुष्काळामुळे निर्माण झालेले जलसंकट आणि शेतातील पिके मातीमोल होत असल्याची भीती मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. यावर तात्काळ प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री म्हणाले की, विंधन विहिरींचे खोलीकरण किंवा नवीन विंधन विहिरी खोदण्यावरील बंदी उठवणे सरकारसाठी काहीसे कठीण आहे. मात्र शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती पाहता विशेष बाब म्हणून हा निर्णय घेतला जात आहे.



मात्र, ही सवलत सरसकट लागू असणार नाही, हे स्पष्ट करताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यासाठी शेतकऱ्यांना प्रशासनाची परवानगी घ्यावी लागेल आणि ही बंदी केवळ झाडे जगविण्यासाठी आवश्यक असलेल्या ठिकाणीच शिथिल केली जाईल. याचबरोबर, पाण्याची नासाडी टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा आणि जास्तीत जास्त जलपुनर्भरण करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या बैठकीत परिसरातील पशुधनाचा मुद्दाही ऐरणीवर आला. विभागात मोठ्या प्रमाणावर पशुधन असूनही पशू दवाखान्यांची वानवा असल्याची व्यथा स्थानिकांनी मांडली. या गंभीर समस्येची दखल घेत, गुरांच्या दवाखान्यांच्या परिस्थितीची त्वरित पाहणी करून तातडीने योग्य निर्णय घेण्याचे कडक निर्देश मुख्यमंत्र्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

तसेच, रखडलेल्या जलजीवन मिशनच्या कामांवर बोलताना ते म्हणाले की, निधीच्या कमतरतेमुळे काही कामे अपूर्ण राहिली आहेत, पण आता ती प्राधान्याने पूर्ण केली जातील. जी कामे ७५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाली आहेत, त्यांना तातडीने निधी उपलब्ध करून दिला जाईल. याशिवाय, वन्य प्राण्यांमुळे शेतातील पिकांचे होत असलेले नुकसान ही एक गंभीर समस्या बनली असून, यासाठी तार कुंपण योजना आणखी व्यापक करण्यात येणार आहे. विशेषतः जंगलाला लागून असलेल्या शेत जमिनींना या योजनेत प्राधान्य दिले जाईल. जलसाठ्यांमधील गाळ काढून ती सुपीक माती शेतात टाकण्याचे कामही सध्या वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दौऱ्यादरम्यान काही महिला सरपंचांनी काही लोक पत्रकार असल्याचे भासवून पैशाची मागणी करत असल्याची धक्कादायक तक्रार केली. यावर अत्यंत आक्रमक भूमिका घेत, ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांना थेट तुरुंगात टाकले जाईल, असा सज्जड दम मुख्यमंत्री फडणवीस यांनी भरला असून पोलिस प्रशासनाला याप्रकरणी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.

ऊसाला ३६०० भाव द्या, अन्यथा एक लाख शेतकऱ्यांचा धडक मोर्चा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर जिल्ह्यात ऊसाला १६ नोव्हेंबर पर्यंत ३६०० चा भाव जाहीर करावा अन्यथा सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर एक लाख शेतकऱ्यांचा धडक मोर्चा काढण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे. आज पंढरपूरमध्ये आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. आज दिवाळीचा पहिला दिवस असूनही शेकडो शेतकरी राजू शेट्टी यांच्या बैठकीसाठी उपस्थित होते.

शेट्टींचा सोलापूर जिल्ह्यातील कारखानदारांना इशारा

सोलापूर जिल्ह्याती ऊस उत्पादकांना पहिली उचल ३६०० रुपये, कारकाना बंद झाल्यावर १०० रुपये पुढील हंगाम सुरु होण्याआधी २०० व साखरेचा दर ४५ रुपयांच्या पुढे गेला तर ७०/३० फॉर्म्युल्यानुसार दर जाहीर करण्याची मागणी शेट्टींनी केलीय.

सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी ३१०० दर जाहीर केला आहे तो आम्हाला कदापी मान्य नाही. साखर उताऱ्यानुसार प्रति टन पहिली उचल ३६०० रुपये जाहीर करावी, असा इशारा शेट्टींनी साखर कारखानदारांना दिला. दरम्यान उद्यापासून सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या ऊस तोडी बंद कराव्यात असं आव्हान राजू शेट्टी यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले आहे. गोकुळमध्ये शासकीय संचालक वाढवण्याच्या निर्णयावर सर्व बाजूंनी टीका होत असताना आज राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्र्यांनी हा पोरकटपणा करायची गरज नव्हती अशा शब्दात टोलेबाजी केली आहे. लोकशाहीने महायुतीचा पराभव करुन गोकुळमध्ये सत्ता समविचारीला दिली होती. मुख्यमंत्र्यांनी लोकशाहीचा हा निर्णय मान्य करणे गरजेचे असताना त्यांच्या १२ संचालकांना त्यांनी फूस लावून बैठकीस जाऊ दिले नव्हते आता त्यांनी लोकशाहीचा आदर करुन या १२ संचालकांना बैठकीला पाठवून द्यावे, असा टोला दखील त्यांनी लगावला. जेव्हा मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन शिवसेना फोडली त्यावेळी त्यांचे आणि एकनाथ शिंदे यांचे सरकार सत्तेत आले. तेव्हा उद्धव ठाकरे यांनी आम्हाला हा निर्णय मान्य नाही असे न म्हणता न्यायालयात गेले पण लोकशाहीचा निर्णय मान्य नाही अशी विरोधी पक्षांनी भूमिका घेतली नव्हती. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी महायुतीच्या संचालकांना बैठकीला पाठवून देऊन लोकशाहीचा आदर करावा असा सल्ला राजू शेट्टी यांनी दिला.

सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी ऊसाला ३१०० ते ३१५० रुपयांचा दर जाहीर केला आहे. मात्र, हा दर मान्य नसल्याची भूमिका राजू शेट्टी यांनी घेतली आहे. ऊसाला प्रतिटन ३५०० रुपयांचा दर द्यावा असी मागणी शेट्टी यांनी केली आहे. १६ नोव्हेंबर पर्यंत ३५०० चा भाव जाहीर करावा अन्यथा सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर एक लाख शेतकऱ्यांचा धडक मोर्चा काढण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे.



संपादकीय....

पहिली दिवाळी

२०२६सालची ही दिवाळी खरोखरच खास आहे! ही पहिली दिवाळी आहे, जेव्हा देशाने नक्षलवाद आणि माओवादी दहशतवादाविरुद्धची दशकांहून अधिक काळ चालेली लढाई जिंकली आहे. ही पहिली दिवाळी आहे, जेव्हा देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादापासून मुक्त झाला आहे. ही पहिली दिवाळी आहे, जेव्हा कोट्यवधी देशवासियांनी नक्षलवादाच्या भीतीवर विजय मिळवला आहे. 'माओवादी दहशतवाद आणि नक्षलवादाविरुद्धची ही लढाई सोपी नव्हती. एक काळ असा होता, जेव्हा देशभरातील जवळपास २० राज्यांमधील २३० हून अधिक जिल्हे नक्षलवादाने प्रभावित होते. संध्याकाळनंतर जनजीवन ठप्प व्हायचे. या नक्षलवाद्यांनी लोकांकडून मतदानाचा हक्कही काढून घेतला होता. बिहार, महाराष्ट्र, ओरिसा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडसह देशाचा मोठा भाग डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांच्या विळख्यात होता. २ वर्षात हजारो नक्षलवादी हल्ल्यांचा सामना करावा लागत होता. २०१०मध्ये, जवळच्या दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत आपले ७६ सुरक्षा कर्मचारी शहीद झाले. १०१० मध्येच, दंतेवाडा येथील आणखी एका घटनेत ४४ निष्पाप नागरिक मारले गेले. पूर्वी नक्षलवादी हल्ल्यांना बळी पडणाऱ्या भागांमध्ये आता जनजीवन पूर्वपदावर येत असल्याचे त्यांनी सांगितले.'मी आपल्या शूर सुरक्षा दलांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी बस्तरला जात आहे. हा प्रदेश एकेकाळी नक्षलवादाने ग्रासलेला होता, पण आता येथे विकास बहरत आहे.' अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली आहे. मी आपल्या शूर सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या त्यागाला, निःस्वार्थ सेवेला आणि राष्ट्राप्रती असलेल्या त्यांच्या अढळ निष्ठेला सलाम करतो. आज नक्षलवादी दहशतवाद संपला असून विकासाचा वसंत ऋतू सुरू झाला आहे. ते म्हणाले, 'मी तुमच्यामध्ये दिवाळी साजरी करण्यासाठी बस्तरच्या जंगलात आलो आहे.' यावेळी पंतप्रधान मोदींनी सुरक्षा दलांमध्ये दिवाळी साजरी करण्यासाठी बस्तरला भेट दिली. त्यांनी काँग्रेस पक्षावर निशाणाही साधला. आज संपूर्ण देश आणि जगभरातील लाखो भारतीय दिव्यांचा पवित्र सण साजरा करत आहेत. लोक दूरदूरवरून आपापल्या घरी पोहोचत आहेत. कुटुंब आणि नातेवाईकांना भेटण्याचा हा एक मोठा सण आहे.

शेतीच्या बांधावर जाऊन मुख्यमंत्र्यांनी केली शेतातील पिकांची पाहणी; सोनेगाव रिठी व कोहळी येथील शेतकऱ्यांनी मांडल्या व्यथा





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : पावसाअभावी शेतातील कापूस व तुरीची झाडे सुकत असून अशा परिस्थितीत कापसाची शेती करणारा शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा शेतकऱ्यांना तातडीने आवश्यक मदत देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कळमेश्वर तालुक्यातील कोहळी या गावातील बाबुराव काळे या शेतकऱ्याला दिली

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्यासाठी व त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी लोहारी सावंगा या गावाला मुक्काम केला होता. आज मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली तसेच दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन सोबत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

लोहारी सावंगा येथून सकाळी सोनेगाव येथे येथील दिलीप सरोदे या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन दुष्काळामुळे कापूस पिकांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. पावसाअभावी कापसाची वाढ झाली नाही तसेच कापसाची बोंड सुद्धा फुटली नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत खचून न जाता शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दुष्काळामुळे शेती नष्ट झाली असतानाच वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास असल्यामुळे सौर कुंपण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी दिलीप सरोदे या शेतकऱ्यांनी केली. वन्य प्राण्यांपासून पिकांच्या संरक्षणासाठी सौर कुंपणाची योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कळमेश्वर तालुक्यातील बाबुराव काळे यांच्या शेताला भेट दिली तसेच कापूस व तुरीच्या पिकांची पाहणी केली. दीर्घ काळापासून पाऊस न पडल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पिकांच्या नुकसानी संदर्भात शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपयाची मदत दिली आहे उर्वरित मदतही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. कुणीही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

शेतकऱ्यांना दुष्काळी मदत देताना ऍग्री स्टॅक ची नोंदणी आवश्यक आहे परंतु दुष्काळी परिस्थितीत या मदतीसाठी ऑनलाईन नोंदणी ऐवजी ऑफलाइन नोंदणी करण्याची सवलत देण्यात आली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली.

दुष्काळी परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार धान्य उपलब्ध होत आहे परंतु ज्या शेतकऱ्यांकडे शिधापत्रिका नाही अशा शेतकऱ्यांना प्राधान्याने नोंदणी करून त्यांनाही लाभ देण्यात यावा अशी सूचना यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. शेतीच्या नुकसानी संदर्भातील पाहणी दौऱ्यात आमदार चरण सिंग ठाकूर, राजीव पोतदार यांचे सह शेतकरी सर्वश्री वसंतराव चापले, संदीप सरोदे, दिनेश दापले, सरपंच बिपीन चापले, नलिनी सतीश रेवतकर, मनोहर कुंभारे आदी शेतकरी तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी अधिकारी उपस्थित होते.

१२ नोव्हेंबरपासून पंढरपुरात भूसंपादनाचे तात्पुरते कार्यालय सुरू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मालमत्ताधारकांच्या सोयीसाठी येत्या १२ नोव्हेंबरपासून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या भक्त निवास येथे भूसंपादन अधिकारी क्रमांक ३ यांचे तात्पुरते कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. या कार्यालयाचे कामकाज दर आठवड्याला मंगळवार, बुधवार आणि गुरुवार असे तीन दिवस चालणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली.

कॉरिडॉर बाधितांना दिलासा; आठवड्यातून तीन दिवस कामकाज : उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख

कॉरिडॉर प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू असून, बाधित मालमत्ताधारकांना नुकसानभरपाईसंदर्भातील दावे, पुरावे व हरकती सादर करता येणार आहेत. नोटीस प्राप्त झालेल्या संबंधितांनी ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा अधिकृत प्रतिनिधी किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पंढरपुरातच कार्यालय सुरू होत असल्याने बाधित मालमत्ताधारकांचा सोलापूरला जाण्याचा वेळ व प्रवासाचा त्रास वाचणार असून, भूसंपादन प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्र्यांची दिवाळी शेतकऱ्यासोबत! लोहारी सावंगाला मिळाला पाण्याचा शाश्वत दिलासा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : दिवाळीचा उजेड जेव्हा शेतकऱ्याच्या घरात मंदावला होता, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली दिवाळी थेट शेतकऱ्याच्या अंगणात साजरी केली. दुष्काळाच्या छायेत असलेल्या नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा गावात मुक्काम करून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या व्यथा ऐकल्या आणि केवळ आश्वासन नाही, तर प्रत्यक्ष पाण्याच्या योजनांचा लाभ देऊन दिलासा दिला.

लोहारी सावंगा हे ४२६४ लोकसंख्या आणि ८४४ कुटुंबांचे गाव आहे. कापूस, तूर, संत्रा, मोसंबी, सोयाबीन, चना, गहू ही येथील प्रमुख पिके आहेत. यंदा पावसाअभावी पिके करपली, संत्रा बागा सुकल्या. अशा कठीण काळात मुख्यमंत्र्यांनी गावात येऊन बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली.

शेतकऱ्यांना सिंचन विहिरी योजनेअंतर्गत दहा शेतकऱ्यांना सिंचन विहीर मंजूर करण्यात आल्या. या विहिरींमुळे शेतकऱ्यांना आता बारमाही पाण्याची सोय होणार आहे.



१० शेतकऱ्यांना सिंचन विहिरींचा लाभ, २४३.३५ लाखांच्या साठवण तलावाचे बांधकाम होणार

लाभार्थी शेतकरी :- विमल शाम राव खडगा, सुमन रामभाऊ थापले, राम चंद्र मधुकर घोडे, मेघनाथ भिमराव राऊत, खुशाल महादेव बरडे, धनराज सदाशिव वैद्य, तेजराव नथुजी फंदी, संध्याताई मनोहर राऊत, रमेश चंपत काळे, दानीश खान हनिफ पठाण

मुख्यमंत्री आमच्या गावात आले, आमचे दुःख ऐकले आणि थेट विहिरीचा लाभ दिला, हाच आमच्यासाठी सर्वात मोठा दिलासा आहे, अशी प्रतिक्रिया लाभार्थी शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

याच दौऱ्यात लोहारी सावंगा येथे साठवण तलावाचे बांधकाम करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. हा प्रकल्प लघु सिंचन मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

साठवण तलाव प्रकल्पाची ठळक माहिती:

- प्रकल्पाचे ठिकाण: मौजा लोहारी सावंगा, ता. नरखेड, जि. नागपूर - नरखेडपासून ४० कि.मी. अंतरावर, गावाच्या दक्षिणेस
- प्रकल्पाची अंदाजित किंमत: २४३.३५ लक्ष रुपये - तलावाची लांबी: २९० मी., महत्तम उंची ९.९० मी., माथा रुंदी ३.०० मी.
- लघुत्तम संचय पातळी : १०२.६० मी. - निम्नतम नाला तळपातळी (छ.इ.ड.): ९७.९० मी.
- सिंचन क्षेत्र: अप्रत्यक्ष सिंचन क्षेत्राला लाभ - लाभ झालेले गाव: लोहारी सावंगा

या साठवण तलावामुळे शेतीच्या सिंचनाला लाभ मिळेल, गावातील विहिरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन पिण्याच्या पाण्याची सोय होईल आणि या परिसरातील शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत होणार आहे. या तलावासाठी वन विभागाच्या मान्यतेने भूसंपादन झालेले आहे.

मुख्यमंत्र्यांचा दिलासा

यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी हा राज्याचा कणा आहे. दुष्काळात शेतकरी एकटा नाही. सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. केवळ मदत देऊन थांबणार नाही, तर शेतकऱ्याला कायमस्वरूपी पाणी देणे हेच आमचे ध्येय आहे.

सिंचन विहीर आणि साठवण तलावामुळे लोहारी सावंगा आता दुष्काळावर मात करेल.

मुख्यमंत्री आमच्या गावात दिवाळीला मुक्कामाला आले, आमच्यासोबत फराळ केला, आमचे दुःख ऐकले आणि पाण्याच्या योजना दिल्या, यामुळे गावात पुन्हा आशेचा उजेड पसरला आहे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

बार्टीने प्रबोधनात्मक उपक्रमाद्वारे साजरा केला विद्यार्थी दिन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सातारा : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला. ती घटना क्रांतिकारी असून. त्यांनी ज्ञानाचा पाया याच सातारा भूमीत रचला पुढे सातारा ते कोलंबिया विश्व विद्यापीठ हा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी असून त्यांचा वारसा आपण सर्वांनी पुढे नेला पाहिजे ,अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.



डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त प्रतापसिंह हायस्कूल जुना राजवाडा, सातारा येथे विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ ज्ञानदेव मस्के, कुलगुरू कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा, डॉ प्रिया शिंदे , अध्यक्षा जिल्हा परिषद सातारा, राजू भोसले, उपाध्यक्ष जिल्हा परिषद सातारा, तेजस्वी कदम, सभापती शिक्षण, अर्थ,व क्रिडा समिती, जिल्हा परिषद सातारा,

बार्टीच्या निबंधक डॉ सुचिता शिंदे, छत्रपती प्रतापसिंह हायस्कूलचे मुख्याध्यापक सन्मती देशमाने, रिपाइंचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख अशोक गायकवाड, दैनिक सम्राटचे संपादक कुणाल कांबळे, पत्रकार अरूण जावळे, प्रविण धसके, पत्रकार कांबळे, पत्रकार सुशील गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सातारा शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी समता सैनिक दल व महार रेजिमेंटच्या माजी सैनिकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास मानवंदना दिली.

बार्टी संस्थेच्या वतीने विद्यार्थी दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक क्रांतीचे तत्त्वज्ञान या विषयावर वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. या स्पर्धेत यश पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळवला तर द्वितीय क्रमांक अनिकेत वनारे यांनी तृतीय क्रमांक वैभवी पाटकर हिने मिळवला उत्तेजनार्थ सजना सरवदे या बालिकेला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, भारताचे संविधान, रोख रक्कम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ सवलतीच्या दरात बार्टी पुस्तक स्टॉववर नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. पुस्तक स्टॉलचे उद्घघाटन समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव डॉ बबन जोगदंड कुणाल कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात ग्रंथ खरेदी करून महामानवास अभिवादन केले.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहिर राजेंद्र कांबळे व संच यांनी विद्यार्थी दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या साता-यातील अनेक आठवणींना उजाळा दिला.

यावेळी महाराष्ट्रील अनेक जिल्ह्यांतुन मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील मान्यवर विद्यार्थी ,भीम अनुयायी उपस्थित होते. विद्यार्थी दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकल्प अधिकारी राहुल गंगावणे, गणेश सवाखंडे, शितल बंडगर, राहुल अहिवळे, रामदास लोखंडे व सम तादूत यांनी परिश्रम घेतले.

शहरातील नागरिकांच्या वतीने पोलिसांचा सत्कार

कळंब पोलिसांची धाडसी कारवाई, मुलीची सुटका आरोपी जेरबंद!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : अपहरण करण्यात आलेल्या मुलीची सुटका करून आरोपीला मोठ्या शिताफीने जेरबंद करणाऱ्या कळंब पोलीसांच्या धाडसी कारवाईचे कळंबकरांनी स्वागत केले आहे.

कठीण प्रसंगातही प्रसंगावधान व संयम राखून कारवाई करणारे पोलीस निरीक्षक शकील शेख, पोलीस अंमलदार गणेश वाघमोडे यांचा कळंब येथील ज्येष्ठ नागरिक व विविध संघटनांच्या वतीने कळंब पोलीस ठाण्यात सत्कार करण्यात आला.

आरोपीस अटक करताना गणेश वाघमोडे यांनी दाखवलेल्या शौर्य व धाडसाचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज आडसुळ, सुरेश टेकाळे, शिवाजीराव गीड्डे, प्रवीण तांबडे, बाळासाहेब कथले, कचरू टकले, सुशील झांबरे, ड. मनोज चोंदे, सुदर्शन कोळपे, कल्याण खापे, माधवसिंग राजपूत, राहुल हौसलमल, सचिन क्षीरसागर, रशीद शेख, नवनाथ भंडारे, राहुल टकले, समाधान गोसावी, श्रीनिवास पाटील, हनुमंत पाटुळे, गुलाब बागवान, बशीर पठाण या सत्कार प्रसंगी उपस्थित होते.

यावेळी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पठाण, पोलीस नाईक भाऊसाहेब पौळ, पोलीस अंमलदार आसाराम खाडे, परमेश्वर कदम, अनिल भोसले यांचे शहरातील नागरिकांच्या वतीने सत्कार करुन अभिनंदन केले. व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी नागरीकांनी सदरील घटनेबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दादा, जरा सबुरीने घ्या.... गाढव-कुत्र्याच्या वादावर पडदा टाका; सोलापूरला वाद नको, विकास हवा!

आमदार देवेंद्र दादा कोठे, सोलापूरकरांच्या अपेक्षा मोठ्या आहेत; वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांपेक्षा विकासाच्या कामांना प्राधान्य द्या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर शहराच्या राजकारणात सध्या गाढव आणि कुत्र्याच्या वादाची चर्चा रंगली आहे. मात्र, या वादातून शहराला काय मिळणार? सर्वसामान्य सोलापूरकरांना अशा शाब्दिक युद्धात रस नाही. त्यांना अपेक्षा आहे ती विकासाची, मूलभूत सुविधांची आणि शहराला नवी दिशा देणाऱ्या नेतृत्वाची! त्याम ुळे आमदार देवेंद्र दादा कोठे यांना एकच सांगावेसे वाटते... दादा, जरा सबुरीने घ्या!



आमदार देवेंद्र दादा कोठे यांच्याकडे सोलापूर शहरा-तील जनता एक विकासाभिमुख आणि आश्वासक नेतृत्व म्हणून पाहत आहे. कामाची पद्धत, एखादा विषय हाती घेतल्यानंतर त्याचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि तो विषय मार्गी लागेपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, ही त्यांची जमेची बाजू आहे. शहरातील अनेक प्रश्नांवर त्यांनी घेतलेली भूमिका आणि कामाचा धडाका यामुळे त्यांच्या नेतृत्वाकडून सोलापूरकरांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

मात्र, दादा एक गोष्ट विसरू नका. आपण आता केवळ एक कार्यकर्ता किंवा राजकीय पदाधिकारी राहिलेला नाहीत, तर जनतेने निवडून दिलेले आम दार आहात. आपल्या प्रत्येक शब्दाकडे, कृतीकडे आणि भूमिकेकडे शहराचे लक्ष असते. त्यामुळे लहान-मोठ्या वादांमध्ये अडकण्यापेक्षा आपल्या पदाची प्रतिष्ठा आणि जबाबदारी जपणे अधिक महत्त्वाचे आहे.

आपल्या विकासकामांना विरोधकांकडून विरोध होणे स्वाभाविक आहे. मात्र, आपल्या कामाच्या पद्धतीवर स्वकीय पक्षातूनही छुपा विरोध होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अशा परिस्थितीत संयम राखणे, राजकीय परिपक्वता दाखवणे आणि आपल्या काम ातूनच विरोधकांना उत्तर देणे अधिक प्रभावी ठरेल.

भारतीय जनता पार्टीची राजकीय संस्कृती ही संघटन, शिस्त आणि विकासाच्या म ुद्द्यांवर आधारित राहिली आहे. त्यामुळे सार्वजनिक व्यासपीठावर वापरली जाणारी भाषा ही पक्षाच्या प्रतिमेला साजेशी असणे आवश्यक आहे. गाढव-कुत्र्याच्या वादात राजकीय प्रतिष्ठा पणाला लावण्यापेक्षा हा विषय आता इथेच संपविण्याची गरज आहे.

दुसरीकडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनीही आपण एका राष्ट्रीय पक्षाचे शहराध्यक्ष आहोत, याचे भान ठेवून भूमिका मांडली पाहिजे. विरोधी पक्ष म्हणून सत्ताधाऱ्यांवर टीका करणे ही त्यांची जबाबदारीच आहे. चुकीच्या कामांवर प्रश्न उपस्थित करणे, जनतेचे प्रश्न मांडणे आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. मात्र, टीका करतानाही भाषेचे भान आणि राजकीय सभ्यता राखली गेली पाहिजे. राजकीय मतभेद असावेत, पण ते वैयक्तिक शाब्दिक संघर्षापर्यंत जाऊ नयेत.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात ४२ नगरसेवक निवडून आणण्यासाठी आमदार देवेंद्र दादा कोठे यांनी मोठे राजकीय प्रयत्न केले. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन त्यांनी निवडणुकीत ताकद लावली. मात्र, आज जेव्हा आमदार कोठे यांच्यावर राजकीय टीका किंवा विरोधाची वेळ येते, तेव्हा त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे हे नगरसेवक कुठे आ-हेत, असा प्रश्न सोलापूरकरांच्या चर्चेतून उपस्थित होत आहे. विजयाच्या वेळी एकत्र असणारे नेते आणि कार्यकर्ते अडचणीच्या काळातही तितक्याच ताकदीने सोबत असले पाहिजेत.

दादा, राजकारणात विरोधक असणारच, स्वकीयांमधू-नही मतभेद असणारच; पण प्रत्येकाला उत्तर देत बसलात तर विकासासाठी अस-लेला वेळ आणि ऊर्जा वाया जाईल. तुमच्याकडे काम करण्याची संधी आहे, जनतेचा विश्वास आहे आणि शहराच्या विकासासाठी काहीतरी वेगळे करून दाखविण्याची क्षमता आहे. त्याचा उपयोग शहराच्या प्रलंबित प्रश्नांसाठी करा.

सोलापूरला चांगले रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्था, रोजगार आणि नियोजनबद्ध विकास हवा आहे. जनतेला कोण कोणाला काय म्हणाले, यापेक्षा शहरासाठी कोणी काय केले, हे जाणून घ्यायचे आहे.


म्हणूनच आमदार देवेंद्र दादा कोठे आणि काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे या दोघांनाही एकच आवाहन आहे. राजकीय संघर्ष जरूर करा, पण तो विकासाच्या मुद्द्यांवर करा. वैयक्तिक वाद-ाला पूर्णविराम द्या आणि सोलापूरच्या विकासासाठी एकम ेकांना जबाबदार धरा.

शेवटी दादा, तुमची आ-ेळख ही गाढव-कुत्र्याच्या वादामुळे नव्हे, तर सोलापूरच्या विकासासाठी केलेल्या कामांमुळे व्हावी, हीच सोलापूरकरांची अपेक्षा आहे.

दादा, जरा सबुरीने घ्या... कारण सोलापूरला वाद घालण-ारे नव्हे, तर विकास घडविणारे नेतृत्व हवे आहे!

उमेश कोळेकर, सोलापूर

दीपावली २०२६ : नरक चतुर्दशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दीड टन रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट







दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : दीपावली २०२६ च्या मंगलमय पर्वानिमित्त नरक चतुर्दशीच्या दिवशी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांची व आकर्षक पानांची मनमोहक सजावट करण्यात आली आहे. या सजावटीसाठी सुमारे दीड टन फ ुलांचा वापर करण्यात आला असून, मंदिर परिसराला आकर्षक व प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले आहे.

देशी-विदेशी फुलांचा आणि आकर्षक पानांचा मनमोहक वापर; बीड येथील श्री. अर्जुन हनुमंत पिंगळे यांच्याकडून सजावट सेवा अर्पण

या फुलांच्या सजावटीसाठी लाल गोंडा, पिवळा गोंडा, शेवंती, ॲस्टर, गुलछडी, गुलाब, ऑर्किड, क्रिसॅन्थिमम, पिंक डेझी, डेझी, कामिनी, पिवळी शेवंती तसेच विविध प्रकारच्या देशी-विदेशी फुलांचा आणि मनी प्लांटसारख्या शोभिवंत पानांचा वापर करण्यात आला आहे. विविध रंगसंगती, फ ुलांची आकर्षक मांडणी आणि कलात्मक सजावटीमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. सदर फुलांची सजावट सेवा बीड येथील भाविक श्री. अर्जुन हनुमंत पिं-गळे यांच्यामार्फत देणगी स्वरूपात अर्पण करण्यात आली आहे.



कळंब येथे लहुजी शक्ती सेनेचा एल्गार - काळी फिती बांधून बोर्डा घटनेचा आक्रमक निषेध

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील मौजे बोर्डा येथे घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी काल सायंकाळी ५ वाजता कळंब पोलीस ठाण्यासमोर लहुजी शक्ती सेना व कळंब येथील नागरिकांच्या वतीने डोक्याला काळी फिती बांधून निदर्शने करण्यात आली.



यावेळी विविध मागण्यांचे निवेदन कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख यांना सादर करण्यात आले. सदर निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणातील आरोपीं-वर कोणतीही हयगय न करता जलदगतीने व कठोरातील कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तपास निष्पक्ष व वेळेत पूर्ण करून दोषारोपपत्र तात्काळ न्यायालयात सादर करण्यात यावे.

तसेच पीडित मुलीला व तिच्या कुटुंबाला पूर्ण संरक्षण, आधार व न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक मदत करण्यात यावी. पीडितेची आ-ेळख व गोपनीयता यांचे पूर्ण पालन करण्यात यावे. कळंब तालुक्यात महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी गस्त वाढवावी व अशा प्रवृत्तीवर कायमस्वरूपी जरब बसवण्यासाठी प्रतिबंधात्म क ठोस कारवाई करण्यात यावी, जेणेकरून पुन्हा कोणत्याही म ुलीसोबत अशी घटना घडू नये अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

तसेच या प्रकरणात स्वतः चा जीव धोक्यात घालून पीडित मुलीचा धाडसाने बचाव करणारे जिगरबाज कर्तव्यदक्ष पो-लीस कर्मचारी गणेश वाघमोडे व कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक शकील शेख यांचा लहुजी शक्ती सेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजी गायकवाड, मानव अधिकार आंदोलन संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे, भाजपा युवा मोर्चा जिल्हा चिटणीस अशोकराव क्षीरसागर, किरण गायकवाड, मनोज कसबे, विठ्ठल ताटे, संतोष कसबे, ईश्वर ताटे, अमर पाटोळे, अविनाश शिंदे, करण जाधव, आदित्य गायकवाड, अजय लोंढे व सर्व नागरिक उपस्थित होते.

मंदिर समिती कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे भाविकांचे हरवलेली पर्स परत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर - वफापूर येथील श्री विष्णुपद मंदिरात दर्शनासाठी आलेल्या डोंबिवली, मुंबई येथील सौ वेधाई विश्वनाथ विच-रे यांची परसंबंधी परिसरात राहून गेली होती मंदिर समितीचे कर्मचारी श्री राकेश पाटकुलकर यांच्या निदर्शनास सदर पर्स आल्यानंतर त्यांनी ती तातडीने सीसीटीव्ही कक्षात जमा केली. कोर्सम ध्ये सुमारे सात ते आठ टोळी सोन्याचे दागिने,१,३०० रुपये रोख रखम आढळून आली. याबाबत त्यांनी मा. व्यवस्थापक प्रवीण कुमार घम यांना माहिती दिली, त्यानंतर शहर पोलीस स्टेशनच्या माध्यम ातून संबंधित भाविकांची ओळख पटवून सदर पर्स त्यांना सुखरूप परत करण्यात आली.

मंदिर समितीचे कर्मचारीचे राकेश पाटकुलकर यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणा उप कर्तव्यदक्षतेचे मंदिर समिती स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

सहा माजी संचालकांचे अपील फेटाळले

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती निवडणुकीसाठी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचा अर्ज मंजूर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर - सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत माजी संचालकांना मोठा धक्का बसला आहे. उमेदवारी अर्जाच्या छाननी मध्ये बाद ठरवण्यात आलेल्या सात माजी संचालकांनी या निर्णयाविरोधात पुणे येथे सहाय्यक निबंधाकडे अपील दाखल केली होते. या पिलावर सोनवणे होऊन माजी आमदार प्रशांत परिचारक यांचा उमेदवारी अर्ज मंजूर करण्यात आला. तर उर्वरित सहा माजी संचालकाचे अपील फेटाळण्यात आले आहे. या निर्णयाविरोधात संबंधित माजी संचालक आता मुंबई उच्च न्यायालयाम ध्ये धाव घेण्याची शक्यता समोर येत आहे.

जल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक २६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या या निवडणुकीसाठी अर्ज दाखल केलेल्या उमेदव-ारी मध्ये माजी आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजन पाटील, बबनराव अवताडे, संजय मामा शिंदे, दिलीप माने यांच्यासह अनेक मातेवर नेत्यांचा समावेश आहे. मात्र बँकेची तत्कालीन संचालक मंडळ २०१८ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८८ अन्वये बरखास्त करण्यात आली होते. त्यानंतर बँकेवर प्रच-ासक नियुक्त करण्यात आले होते. या बरखास्त तिच्या कारवाईमुळे संबंधित



माजी संचालकांना पुन्हा निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यात आल्याचे सांगण्यात येते.

यांनी विरोधात साथ माजी संचालकांनी अपील दाखल केली होते. त्यामध्ये माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांना दिलासा मिळाला आहे. प्रचारक यांनी संचालक मंडळ बरखास्त होण्या पंधरा दिवस आधी म्हणजेच १४ मे २०१८ रोजी संचालक मंडळाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले. त्यावेळी ते संचालक नव्हते. हाच मुद्दा गृहीत धरून त्यांचा उमेदवारी अर्ज मंजूर करण्यात आल्याची समजते.

मातृ उर्वरित सहा माजी संचालकाच्या बाबतीत हा निर्णय लागू न झाल्याने त्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आ-हेत. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत राजकीय सम ीकरणांना नवी वळण मिळाले आहे.

यान निबंधकाच्या निर्णयामुळे उम ेदवारीची संधी गमावलेल्या सहा माजी संचालकाकडून मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याची शक्यता शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे आगामी काळात न्यायालय या प्रकरणाचा का निर्णय देते याकडे संपूर्ण जिल्ह्याची लक्ष लागले आहे. २६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीपूर्वी हे न्यायलेल्यामुळे निवडणुकीचे वा-तावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

परिवहन विभागाच्या छुपे अंतर्गत पाठिंबामुळे अवैध वाहतुकीतून झालेल्या अपघातातील निष्पाप अकरा प्रवाशांच्या मरणोत्तर न्यायप्रकरणी चौकशी निहाय कारवाई करण्याचे मुख्यमंत्री सचिवालयाचे परिवहन आयुक्त यांना आदेश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी मिलिंद जाधव - उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात चालणाऱ्या प्रवासी वाहतुकीचा बळी ठरलेले ११ निष्पाप प्रवासी अपघ-ातात मरण पावले याबाबत निष्पक्ष सखोल चौकशी करून जबाबदार परिवहन कार्यालय उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल व संबंधित कर्मचारी यांच्यावर बी एन एस ॲक्ट अनुसार सुद-ेश मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष डॉ.शरद काशिनाथ धुमाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडे लेखी तक्रारीद्वारे केली होती, याची गंभीर दखल घेऊन मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कार्यालयाने संबंधित परिवहन आयुक्त यांना सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत यामुळे परिवहन विभागात आणि अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांमध्ये कम ालीची खळबळ मारली आहे.

सविस्तर वृत्त असे की कल्याण मुरबाड मार्ग म हामार्गावर अवैदशी प्रवासी वाहतूक सुरू असताना, १३ एप्रिल २०२६ रोजी उल्हास नदीच्या पुलावरील भीषण अपघातात ११ निष्पाप प्रवाशांचा हकनाक बळी गेला आणि त्यास सर्वस्वी जबाबदार असणाऱ्या तथा अवैध प्रवासी वाहतुकीस हेतूपूर्वक छुपा पाठिंबा देणाऱ्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवादाचा होण्याबाबत निवेदनात नमूद आहे,.

सदरच्या अपघातातील ११ प्रवाशांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर बी एन एस ॲक्ट नुसार सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल व्हावा अशी मागणी आणि त्याचे न्यायालयीन संदर्भ तक्रारी निवेदनात दिल्यावरून त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री सचिवालय कक्ष यांनी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांना संबंधित प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले आ-हेत. सबब या प्रकरणी एकच खळबळ मारली असून अवैध प्रवासी वाहतूक आणि त्याच पाठिंबा देण-ारे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई होऊन सदोष मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी मूळ निवेदनात राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष डॉक्टर शरद काशिनाथ धुमाळ यांनी केलेली आहे.

धन्वंतरी पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड प्रतिनिधी – निफाड डॉक्टर असोसिएशनच्या वतीने आयोजित धन्वंतरी पुरस्कार सोहळा शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावर्षीचा मानाचा धन्वंतरी पुरस्कार डॉ. ऋषिकेश दौंड व डॉ. सौ. सारिका दौंड यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी स्तवन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ डॉक्टर डॉ. दिलीप तासकर सर होते. डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुण कातकाडे यांनी प्रास्ताविकातून पुरस्कार सोहळ्यामागील भूमिका व उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असोसिएशनच्या उपाध्यक्षा डॉ. सौ. सविता तातेड यांनी केले.

डॉ. ऋषिकेश दौंड व डॉ. सौ. सारिका दौंड यांना धन्वंतरी पुरस्कार प्रदान

यावेळी व्यासपीठावर डॉ. उत्तमराव डेरले, डॉ. संजीव हाडपे, डॉ. जी. बी. वैष्णव, डॉ. किरण राठी व डॉ. नारायण लोखंडे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. ऋषिकेश दौंड व डॉ. सौ. सारिका दौंड यांना धन्वंतरीची मूर्ती व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सन्मानपत्राची निर्मिती डॉक्टर असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. सुनील कापसे यांनी केली.

या प्रसंगी डॉ. महेंद्र कुलकर्णी, डॉ. सुहास घुगे, डॉ. विलास नाठे, डॉ. जितेंद्र वडघुले, डॉ. सुदर्शन पवार व डॉ. रोहिदास गव्हाणे यांनी आपले मनोगत व्यक्त करून पुरस्कारप्राप्त डॉक्टरांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला डॉ. अमोल घुगे, डॉ. निलेश डेरले, डॉ. नितीन धारराव, डॉ. रुपेश वाघ, डॉ प्रशांत धुमणे डॉ सुदर्शन पवार डॉ. भूषण राठी, डॉ. रोहित धोकरत, डॉ. सचिन ढेमसे, डॉ. राम सानप, डॉ. अमोल पवार, डॉ. शांताराम पानगव्हाने, डॉ. रामेश्वर गोरडे, डॉ. सुश्रुत निफाडकर, डॉ. भाऊसाहेब काळे, डॉ. भूषण सानप डॉ मुक्तेश दौंड डॉ ऋषिकेश हाडपे डॉ विकास जाधव डॉ आदित्य लोखंडे तसेच महिला डॉक्टरांमध्ये डॉ. सारिका डेरले, डॉ. कविता कातकडे, डॉ. वृषाली वाघ, डॉ. कविता धारराव व डॉ.सुप्रिया पानगव्हाने सौ भारती लोखंडे सौ वैष्णव मॅडम सौ हडपे मॅडम सौ कापसे मॅडम यांच्यासह अनेक डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संतोष कडलग, मनोज उगले, संतोष क्षीरसागर, विनोद बनकर, सोमनाथ निकम, जीवन वाघ तसेच पॅथॉलॉजी संघटनेचे रोहिदास गव्हाणे, प्रतीक बाफना, हरीश पवार व गणेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. योगेश क्षीरसागर व डॉ. विपुल नाबारिया यांनी केले. डॉक्टर, केमिस्ट व पॅथॉलॉजी क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी, सेवाभाव व परस्पर स्नेहाचे दर्शन घडले.

नरकचतुर्दशी लक्ष्मीपूजन निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांची माहिती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर – वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. आज नरकचतुर्दशी लक्ष्मीपूजन निमित्त पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.





श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, हिरा नाम, कौस्तुभ मनी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच मोठा, शिरपेच लहान, मोठी बोरमाळ, हायकोल, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, तोडे जोड, मत्स्य जोड इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, खड्यांची वेणी, पाचूची गरसोळी, चिंचपेटी हिरवी, हातसर जोड, पानाड्याचा हार, ठुशी, मास पट्टा, जडावाचे ताणवट जोड, चंद्र, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेठयांची बिंदी, खाड्यांच्या पाटल्या, सोन्याचे बाजूबंद, मत्स्य, रूळ जोड, पैंजण जोड, मोठी नथ, कर्णफुले, सोन्याचा करंडा, तोडे जोड, तारामंडळ, दशावतारीहार इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

राधिका मातेस सिद्धेश्वर टॉप लक्ष्मीहार पुतळ्यांची माळ ठुशी व सत्यभामा मातेस नक्षी टोप ठुशी पुतळ्यांची माळ, जवमनी पदक इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, लफ्फा, दंडपेट्या जोड, झनक झनक हार, तांदळा हार, सूर्यकळी हार, चंद्रहार, शिरपेच, मोत्याची कंठी, लक्ष्मी पदक लॉकेट, चांदीची छत्री व श्री. व्यंकटेशास जवेची माळ, मारवाडी पेट्यांचाहार, इमिटेशन नेकलेस, मोहन माळ, कोयरीहार, तुळशी माळ इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पारंपरिक अलंकाराच्या वेशातील मनमोहक रूप पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे कार्यकारी अधिकारी श्री.श्रीकांत यादव यांनी सांगितले.

स.शि. वसंतराव काळे सह.सा.का. सहयोग ओंकार शुगरच्या शंभर रु. हप्ता शेतकऱ्यांचे खात्यात जमा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर – मागील गळीत हंगामामध्ये सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त दर जाहीर करून ओंकार ग्रुपचे सर्वेसर्वा बाबुरावजी बोत्रे -पाटील यांनी सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखान्याची चेअरमन कल्याणराव काळे यांच्या उपस्थितीत मागील गळीभंगांमध्ये सुरुवातीचे फौजदाराची कोंडी फोडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिलेला होता. जाहीर केल्याप्रमाणे मागील गळीत हंगामात गणिताचा ऊसाला प्रति मेट्रिक टन१००/ रुपये प्रमाणे उर्वरित हप्ता रक्कम शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केला असल्यामुळे दिपवाळी मध्ये शेतकऱ्यांना दिवाळीची भेट मिळाल्याचा आनंद होत आहे. मागील गळीत हंगाम २०२५/२६ मध्ये ज्या ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी सहकार शिरोमणी सहयोग ओंकार शुगर कारखान्यास ऊर्जा दिलेला आहे अशा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिमे ट्रॅक्टर ३१५०/दर जाहीर केलेला होता त्यापैकी ३०५०/ रुपये प्रमाणे बिलाचा हप्ता यापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेला असून उर्वरित रक्कम प्रति मॅट्रिक टन १००/प्रमाणे हप्ताही आज शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला असल्याची माहिती बाबुरावजी बोत्रे पाटील यांनी दिली व शेतकऱ्यांच्या कामाला योग्य दाम देण्यासाठी ओंकार ग्रुपचे सर्व सभा बाबुरावजी बोत्रे पाटील यांनी सहकार शिरोमणी कारखान्याची चेअरमन कल्याणराव काळे प्रयत्नशील असून चालू बळीत हंगाम २०२६/मध्ये हे आलेल्या या येणाऱ्या उसाची वाजवी दर जाहीर करून त्याची बिलेही लवकरात लवकर जमा करण्याची नियोजन करण्यात येत आहे सर्व ऊस उत्पादकक्ष सभासदांनी आपला संपूर्ण ऊस या कारखान्यास देऊन सहकार्य करण्याचे आव्हान जनरल मॅनेजर आर आर साळुंखे यांनी केले आहे तसेच गळीत हंगाम २०२५ /२६ मध्ये ज्या ऊस पुरवठा सभासदांनी या कारखान्यास ऊस पुरवठा केला अद्याप दीपावली निमित सणा निमित्तय मोफत साखर घेतली नाही त्यांनी मुदतीच्या आत मोफत साखर आपली घेऊन जावे असे आवाहन केले.

दिव्यांगांच्या आयुष्यात आशेचा प्रकाश; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी साजरी केली दिव्यांग बांधवांसोबत आनंदाची दिवाळी!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : आपल्या माणसांच्या जीवनातील अंधार दूर करून आशेचा आणि विश्वासाचा दिवा लावणे म्हणजे खरी दिवाळी, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, आरोग्यदूत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्र्यांच्या 'नंदनवन' या निवासस्थानी दिव्यांग बांधवांसोबत दिवाळी स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमामुळे 'नंदनवन' हे केवळ शासकीय निवासस्थान न राहता खऱ्या अर्थाने दिव्यांग बांधवांसाठी 'आनंदवन' बनल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, हे नंदनवन निवासस्थान सर्वसामान्य, गरजू आणि दिव्यांग बांधवांचे हक्काचे ठिकाण आहे. दिव्यांग बांधवांमध्ये प्रचंड जिद्द आणि चिकाटी आहे आणि त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे आमचे कर्तव्यच आहे. आजच्या या कार्यक्रमाने माझी खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी दिव्यांगांच्या कल्याणासाठी राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती देताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, दिव्यांगांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळावा यासाठी राज्यात स्वतंत्र 'दिव्यांग मंत्रालय' स्थापन करण्यात आले, ज्यामुळे अनेक दिव्यांग बांधवांना रोजगार मिळाला व ते स्वतःच्या पायावर उभे राहिले. जिल्हा नियोजन समितीच्या एकूण निधीपैकी एक टक्के निधी हा थेट दिव्यांग बांधवांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.







ठाण्यातील टेंभी नाका येथील आनंद आश्रमात आतापर्यंत दीड हजारांहून अधिक दिव्यांग बांधवांना कृत्रिम हात, पाय (जयपूर फूट), वॉकर, श्रवणयंत्र व इतर आवश्यक उपकरणांचे वाटप करून त्यांना नवी उमेद देण्यात आली आहे. हा उपक्रम केवळ एका शहरापुरता मर्यादित न ठेवता राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये पोहोचवला जाणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

जन्मजात हृदयविकार असलेल्या बालकांच्या महागड्या शस्त्रक्रिया तसेच कॉक्लिअर इम्प्लांटमुळे ऐकू-बोलू लागलेल्या मुलांच्या कुटुंबीयांसोबतही नुकतीच दिवाळी साजरी केली. या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद हा वेगळे समाधान देणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

यंदा दुष्काळामुळे शेतकरी संकटात असून उद्या जालन्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. शेतकऱ्यांनी धीर सोडू नये, टोकाचे पाऊल उचलू नये. सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी असून समाजातील हजारो हातांनीही मदतीसाठी पुढे यावे. ही राजकारणाची नव्हे, तर संकटग्रस्तांच्या पाठीशी माणुसकीने उभे राहण्याची वेळ आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिव्यांग बांधवांसमवेत फराळ केला. उपमुख्यमंत्र्यांनी त्यांना भेटवस्तू देत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

स्वखर्चातून विविध ठिकाणी पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसाचे औचित्य सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन

दुष्काळाच्या झळांमध्ये माणुसकीचा झरा!; अशोक राठोड यांचा मुक्या जनावरांसह वाटसरूंसाठी स्तुत्य उपक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुधनी प्रतिनिधी – अक्कलकोट तालुक्यात यंदाच्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारा स्तुत्य उपक्रम मोरया कन्स्ट्रक्शनचे चेअरमन श्री. अशोक राठोड यांनी राबविला आहे. मुक्या जनावरांची तसेच उन्हातान्हात प्रवास करणाऱ्या वाटसरूंची तहान भागावी, या उदात्त हेतूने त्यांनी स्वखर्चातून विविध ठिकाणी पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था केली आहे.

दुष्काळामुळे ग्रामीण भागात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असताना जनावरांना पिण्याचे पाणी मिळणेही मोठे आव्हान बनले आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन अशोक राठोड यांनी स्वतःच्या खर्चातून विविध ठिकाणी बोअरवेल करून घेतल्या आहेत. तसेच ज्या रस्त्यांवरून जनावरांची नियमित वर्दळ असते, अशा ठिकाणी जनावरांसाठी पाण्याचे हौद उभारण्यात आले आहेत. त्याचबरोबर वाटसरूंना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पाणपोईचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

स्वखर्चातून बोअरवेल, जनावरांसाठी पाण्याचे हौद आणि वाटसरूंसाठी पाणपोईची व्यवस्था; सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श

विशेष म्हणजे, या संपूर्ण उपक्रमासाठी कोणताही शासकीय निधी किंवा देणगी न स्वीकारता त्यांनी स्वतःच सर्व खर्च उचलला आहे. त्यामुळे त्यांचा हा उपक्रम केवळ पाणी उपलब्ध करून देणारा नसून सामाजिक संवेदनशीलतेचा आणि निस्वार्थ सेवेचा आदर्श ठरत आहे.

सामान्यतः उन्हाळ्यात वाटसरूंसाठी पाणपोई उभारल्या जातात; मात्र मुक्या जनावरांच्या तहान भागविण्यासाठी कायम स्वरूपी पाण्याचे हौद उभारण्याचा विचार अत्यंत कौतुकास्पद आहे. बोलता येत नसलेल्या प्राण्यांची वेदना ओळखून त्यांच्यासाठी पुढाकार घेणे, हीच खरी माणुसकी असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

मा. आमदार श्री. सचिन कल्याणशेट्टी साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दि. ५ नोव्हेंबर रोजी या सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अशोक राठोड यांच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी अप्पू परमशेट्टी, शंकर भांजी, आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, निंगप्पा निंबाळ, गुरुशांत हौशेट्टी, शिवपुत्र गायकवाड, बसवराज जन्ना, हणमंत कलशेट्टी, काशिनाथ यरगल, सातलिंग अल्लापूर, मन्नू राठोड, पोमू राठोड, अविनाश राठोड, रामू चव्हाण, हुसेन जाधव, शिवाजी चव्हाण, राजकुमार पवार, शिवा राठोड, लक्ष्मण राठोड, शेतकरी संघटना यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजसेवा हीच खरी ईश्वरसेवा, या विचाराला प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित करणारा अशोक राठोड यांचा हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी आहे. दुष्काळाच्या संकटात माणसांसोबतच मुक्या जीवांची तहान भागविण्यासाठी पुढे आलेल्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

